महाराष्ट्र

पंचांग

१५ ऑगस्ट २०१९, गुरवार, विक्रम संवत्- २०७५,

शालिवाहन शके संवत्- १९४१, संवत्सर- विकारीनाम,

अयन- दक्षिणायण, मास- श्रावण, ऋतु- वर्षा, शुक्ल पक्ष,

तिथि:पूर्णिमा १७:५९:०७, नक्षत्र:श्रवण ०८:०२:१४,

योग:सौभाग्य ११:५९:४३, करण:बव १७:५९:०७,

करण:बालव (अहोरात्र), सूर्य:कर्क, चन्द्र:कुम्भ२१:२८:०७

विशेष- रक्षाबंधन, स्वातंत्र्य दिन, बृहस्पती पूजन, तैत्तिरय हिरण्यकेशी श्रावणी, हयग्रीवोत्पत्ति, श्रीम्हाळोबा यात्रा - दोडी बु. (नाशिक), पौर्णिमा समाप्ती सायं ५.५८

सुविचार

सभ्य माणसाचे लक्षण हे की तो दुसऱ्याला दुखवीत नसतो.
- कार्डिनल न्यूमन

कथा उपदेश

स्वार्थ

राजा वीरेंद्रसिंह एकदा शिकारीला निघाले होते. शिकार आणि घोडदौड हे त्यांच्या आवडीचे विषय होते. नेहमीप्रमाणे लवाजमा घेऊन वीरेंद्रसिंह जंगलच्या रस्त्याला लागले. गाव मागे पडले अन् जंगलाचा रस्ता सुरू झाला. राजाने पाहिलं तर समोर एक वृद्ध गृहस्थ कसले तरी रोप लावत होता. राजाला आश्चर्य वाटले. त्याने विचारले, 'म्हातारबा, कसले रोप लावताहात?' म्हातारा म्हणाला, 'राजा, आरं मी बदामाचं झाड लावतोया.' राजा म्हणाला, 'ते खरं म्हातारबा, पण त्याचा तुम्हाला काय उपयोग? हे झाड वाढणार कधी अन् त्याला बदाम लागणार कधी? कदाचित तुम्ही तेव्हा असणारही नाही. कशाला एवढे कष्ट घेत आहात?' म्हातारा शांतपणे म्हणाला, "ते मला कळतंया रं ! पण स्वत:च्या पोटापुरतं पाहणारा मनुष्य नीच असतो. मला फळं मिळाली नाहीत तर काय झालं? कुणाला तरी मिळतीलच ना !"

कथा उपदेश : स्वार्थी माणूस स्वत:चाच विचार करतो.

(गुरु वचन)

आईच्या संरक्षणासाठी जीव दिला

मनुष्याच्या विकासात आई-वडिलांची महत्वाची भूमिका असते. ते मुलांना वाढवतात व त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास सक्षम बनवतात. तसेच मरेपर्यंत आपल्या मुलांच्या कल्याणाचीच प्रार्थना करतात. जगातील सर्व देवता, पैगंबर, साधु-संत व महापुरुषांनी आई-वडिलांच्या सेवेस पुण्य कर्म संबोधले आहे. भगवान बुद्धांनी देखील या सत्याचा अनुभव केला होता म्हणून त्यांनी जीवनात आई-वडिलांना महत्वपूर्ण स्थान दिले. आपल्या उपदेशात ते नेहमी आई-वडिलांची सेवा करण्यास सांगत होते. बौद्ध धर्माचा ग्रंथ सुत्तानिपातच्या पराभव सुत्तात भगवान बुद्धांनी देवास उपदेश देत सांगितले आहे की, जो व्यक्ती आपल्या आई-वडिलांचा सांभाळ किंवा पालन-पोषण करत नाही, त्याचा नाश निश्चित असतो. या ग्रंथाच्या महामंगल सुत्तात बुद्ध म्हणतात की, आई-वडिलांची सेवा करणे सर्वोच्च मंगल कार्य आहे. धम्मिक सुत्तात गृहस्थ धर्माची व्याख्या करत ते सांगतात की, जो धर्मानुसार आई-वडिलांची सेवा करतो, तो स्वयंप्रभ नावाच्या देवलोकात उत्पन्न होतो. बौद्ध धर्माचा प्रसिद्ध ग्रंथ धम्मपदात बुद्ध सांगतात, जगात आई-वडिलांची सेवा सुखकर असते. बुद्धांनुसार आई-वडिलांचे स्थान सर्वोच्च असते. आई-वडिल आपल्या मुलांचे पालनपोषण करुन मोठे करतात, त्यांना जीवनात अग्रेसर राहण्यासाठी समर्थ बनवतात व जीवनभर त्यांना आशिर्वाद देतात. आई-वडिल वृद्ध व असहाय झाल्यावर त्यांची सेवा करणे मुलांचे नैतिक कर्तव्य असते. जर त्यांनी नैतिक कर्तव्याचे पालन केले नाही तर ते अधर्माचे भागीदार होतात व समाजात त्यांची निंदा होते. बुद्ध याबाबतीत खुप संवेदनशील होते म्हणून त्यांनी व्यवस्था दिली की, व्यक्ती आपल्या आई-वडिलांच्या परवानगीशिवाय भिख्खुसंघात दीक्षा घेऊ शकत नाही. याचे तात्पर्य व्यक्ती आपल्या आई-वडिलांप्रती कर्तव्य सोडून भिक्खु बनू शकत नाही. बुद्धांने गृहस्थासाठी दिलेल्या तत्वात आई-वडिलांची सेवा प्रथम होती. प्राचीन भारतात आई-वडिलांची सेवा सर्वात मोठे मूल्य मानले जात होते. या मूल्याच्या प्रचार-प्रसारासाठी पुराण व बौद्ध जातक कथांमध्ये अनेक प्रसंग मिळतात, ज्याच्या माध्यमातून यास जास्त व्यावहारिक बनवले जाऊ शकेल. श्रवणकुमारची गोष्ट सर्वांना माहित आहे. येथे अनेक लोककथा व लोकगीतांमध्ये आई-वडिलांच्या सेवाचा उल्लेख करण्यात आला आहे. जातक कथांमध्ये असे अनेक संदर्भ मिळतात, ज्यात बोधिसत्वांनी आपल्या आई-वडिलांच्या सेवेत जीवनाची आहुती दिली होती.

१५ ऑगस्टला जन्मलेल्या लोकांचे भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर बुध, शुक्र व सूर्याचा दुहेरी प्रभाव आहे. तुमचे व्यक्तिमत्व रूबाबदार असते. बोलणेचालणे इतरांवर छाप पाडणारे असते. आपले राहणीमान जरा उच्च पातळीचे असावे असे तुम्हाला वाटते. त्यासाठी पैसा मिळवण्याची धडपड तुम्ही करीत असता. भरपूर पैसा कमावून जीवनाचा सौंदर्यासक्त वृत्तीने उपभोग घ्यावा अशी तुमची आकांक्षा असते. संगीत, नृत्य, नाट्य यांच्या आस्वादात तुम्हाला रस असतो व कलाक्षेत्रात आपल्या सर्जनशीलतेच्या जोरावर नवी निर्मितीही करू शकता.

विनासायास धनप्राप्तीच्या फसव्या जाहिरातींच्या जाळयात अडकू नका. गुंतवणूक करतांना कंपन्यांचा ताळेबंद, अंदाजपत्रक, नफ्याचे वार्षिक प्रमाण लक्ष्यात घ्या. विलासांचा अतिरेक झाल्यास पचनसंस्थेचे, किडनीचे विकार सतावतील धूम्रपान, मद्यपान वर्ज्य करा.

कार्यक्षेत्र : ललित वाङ्.मयाचे लेखन, मुद्रण वा प्रकाशन लाभदायक ठरेल. सौंदर्यप्रसाधने, अलंकार, चैनीच्या वस्तू यांच्या कारखान्यात वा कंपन्यात लवकर प्रवेश मिळून प्रगती होईल. नाटक, चित्रपट, दूरदर्शन क्षेत्रात लेखन, अभिनय, रंगभूषा या शाखात कामगिरी कराल. मनोरंजनात्मक कार्यक्रम, टीव्ही, टेपरेकॉर्डर, म्युझिक सिस्टिम यांच्या उत्पादनांच्या एजन्सी वितरणातून लाभ होतील.

प्रणयी जीवन : प्रियकराच्या देखणेपणाला तुम्ही महत्व देता. त्याचे व्यक्तिमत्व प्रसन्न, आकर्षक चारचौघात उठून दिसणारे असावे असा तुमचा आग्रह असतो. जीवनाकडे पाहण्याचा त्याचा ह्ष्टीकोन रसिक व सौंदर्यपासक असावा असे तुम्हाला वाटते. एप्रिल २१ ते मे २० दरम्यान जन्मलेल्या व्यक्ती तुमच्या या अपेक्षा पूर्ण करतील.

वर्षफळ : मंत्रतंत्र, गूढविद्या यांच्या अभ्यासाकडे कल होईल. आध्यात्मिक मार्गदर्शन मिळेल. गुरूकृपाही लाभेल. ऑगस्ट सप्टेंबर मध्ये प्राप्तीचा आलेख उंचावत राहील. ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये आध्यात्मिक प्रगतीचा टप्पा गाठाल. जानेवारी फेब्रुवारी मध्ये व्यवसायाची घडी बसेल, प्रतिष्ठा लाभेल. मार्च एप्रिल मध्ये जागा खरेदीचे बेत पक्के होतील. मे जून मध्ये कलाक्षेत्रात रसिकांचा प्रतिसाद मिळेल.

महत्वाचे वर्ष : ६, १५, २४, ३३, ४२, ५१, ६०, ६९.

भाग्यरत्न : हिरा

याच तारेखेची व्यक्ती : संत ज्ञानेश्वर, अरविंद घोष, राखी

हास्यविनोद

तुझं वय किती? बस कंडक्टरने छोट्या मुलीला विचारले.
'आठ'
'मग अर्धे तिकीट' कंडक्टर म्हणाला. मुलगी गोड हसली.
'तू बारा वर्षाची केव्हा होणार?' कंडक्टरने विचारले.
'बसमधून उतरले की लगेच.'

मित्राच्या मदतीने पत्नीकडून पतीवर उकळतं तेल टाकत जीवघेणा हल्ला

वसई, दि. १४ (वार्ताहर) : मित्राच्या मदतीने पत्नीने पतीवर प्राणघातक हल्ला केल्याची घटना वसई पश्चिममध्ये घडली आहे. पतीचे पाय बांधून, अंगावर उकळतं तेल टाकत, डोळ्यात मिरची पूड, डोक्यावर हातोडीने वार करून पतीची हत्या करण्याचा प्रयत्न केल्याच्या घटनेने खळबळ उडाली आहे. सध्या पोलिसांनी पत्नी आणि तिच्या मित्राला ताब्यात घेतलं आहे. तर पतीला मुंईच्या जेजे रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. भविष्य भु-हागोहा असं जखमी पतीचं नाव असून क्विन्सीया भु-हागोहाय असं पत्नीचं नाव आहे. वसई पश्चिमच्या उमेळमान परिसरातील प्रतापगड या इमारतीत ही घटना घडली आहे. कौटुंबिक भांडणातून क्विन्सीयानं आपल्या पतीला मारहाण करताना उकलतं तेल त्याच्या अंगावर आणि डोळ्यात फेकलं. तसेच हातोडीने डोक्यावर प्रहार केले. घरात मिळेल त्या सामानाने त्याला मारहाण केली. त्याचे पाय रस्सीने बांधून त्याला टॉयलेटमध्ये ठेवलं होतं. जखमी भविष्यनं जीव वाचवण्यासाठी प्रेशर कुकर आणि स्पीकर हे किचनच्या खिडकीतून बाहेर फेकल्यावर आजूबाजूचे रहिवाशी त्याच्या रुममध्ये पोहचले आणि त्यांनी पोलिसांना बोलावून घेतलं. ही सर्व मारहाण होत असताना त्यांची दोन लहान जुळी मुलंही घरी होती. या प्रकरणी पत्नी क्विन्सीया भु-



हागोहाय आणि तिचा मित्र सतवीर नायक याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. पतीने केलेल्या आरोपानुसार पत्नी आणि तिच्या प्रियकराने हे कृत्य केलं आहे. तर पत्नीने पोलिसांना सतवीर हा पतीचा मित्र असल्याचं सांगितलं आहे. घटनास्थळी सतवीर उपस्थित होता. त्यामुळं त्याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. क्विन्सीयाच्या आईवडीलांनी भविष्य हा आपल्या मुलीला मारहाण करत असल्याच सांगितलं आहे. क्विन्सीया ही ख्रिश्चन तर भविष्य हा आसामचा मुळचा रहिवाशी होता. या दोघांनीही आंतरजातीय प्रेमविवाह केला होता. भविष्य हा मुंबईतील एका कॉल सेंटरमध्ये काम करत होता. ते वसईच्या उमेलमान परिसरातील प्रतापगड या सोसायटीमध्ये भाड्यानं राहात होते. त्यांना दोन लहान जुळी मुलं ही आहेत. भविष्यला पोलिसांनी मुंबईच्या जे. जे. रुग्णालयात हलवलं आहे. त्याची प्रकृती चिंताजनक आहे. तर क्विन्सीया आणि सतवीर याला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

भाऊ-बहिणीच्या अतूट नात्याचा सण म्हणजे रक्षाबंधन, ठाण्यातील गार्डन स्कुल मध्ये मंगळवारी लहानग्यांनी मोठ्या उत्साहात रक्षाबंधन साजरा केला. (छाया:दीपक कुरकुंडे)

डीएसकेंच्या भावाला १७ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी

पुणे, दि. १४ (वार्ताहर) : कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी डीएस कुलकर्णी यांचे भाऊ मकरंद कुलकर्णी यांना १७ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने बुधवारी दिला.

ठेवीदारांची २ हजारांहून जास्त फसवणूक केल्याप्रकरणी अटकेत असणारे घोटाळ्यातील बिल्डर डी. एस. कुलकर्णी यांचे बंधू मकरंद कुलकर्णी यांना मंगळवारी मुंबई विमानतळावर अटक करण्यात आली होती. मकरंद कुलकर्णी देश सोडून पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना त्यांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती समोर आली होती. नंतर त्यांना पुणे पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर मकरंद कुलकर्णी फरार होते.

यानंतर पोलिसांनी मकरंद कुलकर्णी यांच्याविरोधात लूकआऊट नोटीस जारी केली होती

कृत्रिम पावसाचा केवळ खटाटोप, पाऊस पाडणारे विमान सौदी अरेबियात

औरंगाबाद, दि. १४ (वार्ताहर) : दुष्काळग्रस्त मराठवाड्याला कृत्रिम पावसाच्या नावाखाली राज्य सरकारने फसवले की काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या शुक्रवारपासून कृत्रिम पाऊस पाडण्याचा प्रयोग राज्य शासनाने हाती घेतला. मात्र, तो प्रयोग नसून ती फक्त चाचणी असल्याचे समोर आले आहे. सोलापूरमध्ये असलेले आयआयटीएम म्हणजेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजीचे विमान उसने आणून ही 'चाचणी' घेण्यात आली. त्यात गेली चार दिवस पाऊसच पडला नसल्याने तेही विमान माघारी परतले आहे.

कृत्रिम पाऊस पाडणारे विमान अद्याप सौदी अरेबियात आहे. आता या प्रयोगासाठीचं विमान १७ ऑगस्टला दाखल होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. राज्य शासनाने ज्या केसीएमसी कंपनीला कंत्राट दिले आहे, त्या कंपनीचे विमान १७ ऑगस्टला येईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ते विमान सध्या सौदी अरेबियात आहे.

त्यानंतर ते अहमदाबादला येईल. त्याठिकाणी कस्टमची पूर्तता पूर्ण झाल्यानंतर औरंगाबादमध्ये दाखल होईल. त्यानंतर कृत्रिम पावसाच्या खऱ्या प्रयोगाला सुरुवात होईल.

धक्कादायक म्हणजे ८ ऑगस्ट रोजी औरंगाबादमध्ये पत्रकार परिषद घेऊन सर्व परवानग्या, कस्टमचे विषय संपले असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले होते.

या सगळ्या खटाटोपानंतर कृत्रिम पावसाची चाचणीच झाल्याचे उघड झाले आहे. राज्य शासनाकडून कृत्रिम पावसाची तारीख पाळण्यासाठी ही चाचणी दाखवून दिल्याची चर्चा आता सुरू झाली आहे.

पश्चिम रेल्वे

सीसी एप्रन/ड्राय पिट संबंधित काम

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डब्ल्यूए), पश्चिम रेल्वे, ६वा मजला, अभि. विभा., मुंबई सेंट्रल - ४०० ००८, खाली दिलेल्या तपशिलांनुसार ई-निविदा आमंत्रित करत आहेतः **निविदा सूचना क्र.: बीसीटी/१९-२०/२१३ दिनांक १३/०८/२०१९ काम आणि ठिकाण:** मुंबई सेंट्रल (कोचिंग डेपो):- सीसी एप्रन/ड्राय पिट संबंधित काम. **कामाची अंदाजे किंमत:** ₹ २,८२,०४,७१६.६४, **इरठे:** ₹ २,९१,०००/-, **निविदा सादर करण्याची तारीख व वेळ:** ०९/०९/२०१९ रोजी १५.०० वा. पर्यंत. **निविदा उघडण्याची तारीख व वेळ:** ०९/०९/२०१९ रोजी १५.३० वा. निविदा कागदपत्राचे किंमत (ना-परतावा), इरठे, पात्रता निकष, कामाचे तत्सम स्वरुप, तपशिलवार निविदा नियमांसहित कामाचे तपशिलवार स्वरुपाकरिता, कृपया **www.ireps.gov.in** ला भेट द्या. मॅन्युअल प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

आम्हाला सोडक करा: facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे

शुद्धिपत्रक - I

खालील निविदा अधिसूचनेसंदर्भात, कृपया खालील दुरुस्त्यांवर लक्ष द्यावे: **अ.क्र.१. नि.आ.सू. क्र. : सीए-११-बल्क एसटीएन-नालासोपारा-२०१९ दि. ०८/०८/२०१९. वर्तमानपत्रात प्रकाशित :** पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागातील दहिसर स्टेशनवर ५ वर्षांच्या कालावधीसाठी थोक जाहिरातींच्या हक्कांसाठी ५ वर्षांच्या कालावधीसाठी निविदा. **काम व ठिकाण असे वाचण्यात यावे :** पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागातील नालासोपारा स्टेशनवर ५ वर्षांच्या कालावधीकरिता थोक जाहिरातींच्या हक्कांसाठी निविदा. **अ.क्र.२. नि.आ.सू. क्र. : सीए-११-बल्क एसटीएन-खार-२०१९ दि. ०८/०८/२०१९. वर्तमानपत्रात प्रकाशित :** पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागातील दहिसर स्टेशनवर ५ वर्षांच्या कालावधीसाठी थोक जाहिरातींच्या हक्कांसाठी ५ वर्षांच्या कालावधीकरिता निविदा. **काम व ठिकाण असे वाचण्यात यावे :** पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागातील खार रोड स्टेशनवर ५ वर्षांच्या कालावधीसाठी थोक जाहिरातींच्या हक्कांसाठी निविदा. **अ.क्र.३. नि.आ.सू. क्र. : सीए-११-बल्क एसटीएन-जोगेश्वरी-२०१९ दि. ०८/०८/२०१९. वर्तमानपत्रात प्रकाशित :** पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागातील दहिसर स्टेशनवर ५ वर्षांच्या कालावधीसाठी थोक जाहिरातींच्या हक्कांसाठी ५ वर्षांच्या कालावधीसाठी निविदा. **काम व ठिकाण असे वाचण्यात यावे :** पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागातील जोगेश्वरी स्टेशनवर ५ वर्षांच्या कालावधीकरिता थोक जाहिरातींच्या हक्कांसाठी निविदा. **वरील निविदेची इतर सर्व अटी व शर्ती यथावत राहतील.**

आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly

नाशिक महानगरपालिका, नाशिक
विद्युत व यांत्रिकी मलनि:सारण विभाग
जाहीर ई-निविदा सूचना क्र. १६/२०१९-२०

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुचि प्रकरण ५ संविदा २ (१) अन्वये नाशिक महानगरपालिका खालील कामाच्या योग्य त्या पंजीकृत मक्तेदाराकडून ई(ऑनलाईन) निविदा मागवित आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	प्राकलन र. रु.	कोरे निविदा शुल्क र.रु.
१.	मनपाचे टाकळी मलउपसा केंद्र (SPS) येथे नवीन सबमर्सिबल पंप बसविणे.	४४,८३,५६६/-	५००/- + रु. ९० (GST १८%) + रु.९०/-
२.	मनपाचे ३६.५ दलली/क्षमतेचे नांदुर दसक सिंवेज पंपीग स्टेशन चे १२ महिने कालावधी करीता दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे करुन घेणे बाबत.	२०,१०,१२२/-	५००/- + रु. ९० (GST १८%) + रु.९०/-

टीप :-
१. ऑनलाईन ई निविदा विक्री व स्वीकृती महाराष्ट्र राज्य शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.
२. कोरे निविदा संच विक्री व स्वीकृती दि. १५.०८.२०१९ ते २९.०८.२०१९ दुपारी ३.०० पर्यंत.
३. ऑनलाईन सादर केलेल्या निविदा दि. ३०.०८.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजेनंतर शक्य झाल्यास कार्यकारी अभियंता (यां) यांचे समक्ष उघडण्यात येतील.

सही/-
अधीक्षक अभियंता (यां)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

ज.सं./जा.क्र./२१७/दि. १४.०८.२०१९
पाणी म्हणजे जीवन, हेच आपले स्पंदन

रामगोपाल पॉलीटेक्स लिमिटेड
सीआयएन : L17110MH1981PLC024145 Website:www.ramgopalpolytex.com
ई-मेल : rplcompliance@ramgopalpolytex.com दू. क्र. : (०२२) २२८३४८३८ फॅक्स क्र. : ०२२-२२८५१०८५
नोंदणीकृत कार्यालय : ग्रीनटेक्स क्लीअरिंग हाउस, बी-१, २ एवं ३, गोसरानी कंपाउंड, रेहनाल गाव, भिवंडी, ठाणे - ४२१ ३०२.
कॉर्पोरेट कार्यालय : ७०१, तुलसीयानी चेंबर्स, फ्री प्रेस जरनल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.

दि. ३० जून, २०१९ रोजी संपलेल्या तिमाहीकरिताच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा सारांश

(रु. लाखात, प्रति शेअर डाटा वगळता)

अ. क्र.	तपशील	दि. ३०.०६.२०१९ रोजी संपलेली तिमाही	दि. ३१.०३.२०१९ रोजी संपलेली तिमाही	दि. ३०.०६.२०१८ रोजी संपलेली तिमाही	दि. ३१.०३.२०१९ रोजी संपलेले वर्ष
		अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित (टीप २ पाहा)	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित
1	परिचालनातून एकूण उत्पन्न	-	25.58	-	710.92
2	कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपूर्व)	(6.04)	(11.90)	(2.49)	(47.86)
3	कर पूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपश्चात)	(6.04)	(11.90)	(2.49)	(47.86)
4	कर पश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपश्चात)	(6.04)	(11.90)	(2.56)	(47.93)
5	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता (करपश्चात) नफा/(तोटा) समाविष्ट व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) समाविष्ट)	(4.62)	25.04	(1.20)	(9.61)
6	प्रदानित समभाग भांडवल	1,439.63	1,439.63	1,439.63	1,439.63
7	अन्य समभाग मूल्यांकन आरक्षण वगळता				379.48
8	उत्पन्न प्रतिशेअर (रु. १०/- प्रत्येकी) मूलभूत व सौम्यीकृत (वार्षिकरित्या नाही)	(0.04) (0.04)	(0.08) (0.08)	(0.02) (0.02)	(0.33) (0.33)

टीप :
१. वरील विवरण हे सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल करण्यात आलेल्या स्टॉक एक्सचेंजसह स्थायी तिमाही अखेर अहवाल व एकत्रित तिमाही अखेर अहवाल यांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश . तिमाही वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्सचेंज वेबसाइट अर्थात www.bseindia.com व कंपनीची वेबसाइट www.ramgopalpolytex.com वर उपलब्ध आहे.
२. दि. ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता संख्या व उर्वरित थकित संख्या लेखापरिक्षीत संख्या संपूर्ण वित्तीय वर्ष व प्रसिद्धी वर्ष यांच्या पॉलिसीजसह सुधारणांसह निव्वळ नफा/तोटा, एकूण सर्वसमावेश उत्पन्न वा कोणतेही अन्य संबंधित वित्तीय बाबींचा अहवाल जोडण्यात येईल.

रामगोपाल पॉलीटेक्स लिमिटेड यांचे संचालक यांच्याकरिता व त्यांच्या वतीने
सही/-
संजय जाटिया
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक (डीआयएन : ००९१३४०५)

ठिकाण : मुंबई
दिनांक : १४.०८.२०१९

पुरग्रस्तांना मदतीचा ओघ सुरूच मुंबई फ़िल्म फेडरेशनकडून ५ लाखांची मदत

मुख्यमंत्री सहायता निधी मध्ये होणार रक्कम जमा

मुंबई, दि. १४ (प्रतिनिधी) : आभाल फाटले सारे., कोप झाला नियतीचा., वाहुन गेल्या संसाराला,, हात मिलाला मदतीचा. खरोखरच अस्मानी संकटाचा कोप होऊन उद्याच्या भाव विश्वाची स्वप्ने पाहनार्या कुटुंबाची क्षनात जीवनाची माती झाली. घर दार, नात गोत सार काही वाहुन गेल, अशा भयान परिस्थितित कोल्हापुर, सांगलीकरांना पुन्हा नव्या उमेदीसाठी सावरन्यासाठी महाराष्ट्र मधुन मद्तीचा ओघ सुरू झालाय. कुनी धान्य, कुनी कपडे तर कुनी पैशाची मद्त देत आहे. फ़िल्म फेडरेशन या आशीया खंडातील नामवंत असनार्या संस्थकडून पुरग्रस्तासाठी ५ लाखांची मद्त राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्र फड़नवीस यांच्या सहायता निधि म्हनुन सुपुर्द करन्यात आला आहे. आज फ़िल्म फेडरेशनचे जनरल सेक्रेटरी अशोक दुबे यांनी मुख्यमंत्री फड़नवीस यांच्याकडे ५ लाखांचा चेक देताना सोबत राजेंद्र सींग, अशोक पंडीत, राकेश मौरया, शरद शेलार आदि उपस्थित होते.

झेनिथ बिर्ला (इंडिया) लिमिटेड
सीआयएन : L29220MH1960PLC011773
नोंदणीकृत कार्यालय : ५ वा मजला, इंडस्ट्री हाउस, १५९, चर्चगेट रिक्लेमेशन, मुंबई - ४०० ०२० **दूर. क्र. :** (०२२) २२०४७८३५ **फॅक्स क्र. :** ०२२-२२०४७८३५
ई-मेल : zenith@zenithsteelpipes.com वेबसाइट : www.zenithsteelpipes.com

दि. ३० जून, २०१९ रोजी संपलेल्या तिमाहीकरिताच्या वित्तीय निष्कर्षांचा सारांश

(रु. लाखात, प्रति शेअर डाटा वगळता)

अ. क्र.	तपशील	स्थायी				एकत्रित			
		तिमाही अखेर			वर्ष अखेर	तिमाही अखेर			वर्ष अखेर
		30.06.2019	31.03.2019	30.06.2018	31.03.2019	30.06.2019	31.03.2019	30.06.2018	31.03.2019
		Unaudited	Audited	Unaudited	Audited	Unaudited	Audited	Unaudited	Audited
१.	परिचालनातून एकूण उत्पन्न	2316	4535	3072	15008	2720	6601	4400	19741
२.	कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपूर्व)	(316)	(8106)	(888)	(11272)	(370)	(8000)	672)	(11358)
३.	कर पूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपश्चात)	(316)	(8107)	(897)	(11931)	(370)	(8001)	(681)	(12017)
४.	कर पश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक व/वा असामान्य बाबीपश्चात)	(316)	(8107)	(897)	(11931)	(370)	(8001)	(681)	(12017)
५.	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता (करपश्चात) नफा/(तोटा) समाविष्ट व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) समाविष्ट)	(316)	(7778)	(340)	(11242)	(370)	(7672)	(681)	(11328)
६.	समभाग भांडवल	13128	13128	13128	13128	13128	13128	13128	13128
७.	राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळता) गत वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार				(36259)				(37306)
८.	उत्पन्न प्रतिशेअर (अतिरिक्त बाबी के पूर्व) (दर्शनी मूल्य रु. १०/- प्रत्येकी)								
	मूलभूत	(0.24)	(6.17)	(0.68)	(8.59)	(0.28)	(6.09)	(0.51)	(8.65)
	सौम्यीकृत	(0.24)	(6.17)	(0.68)	(8.59)	(0.28)	(6.09)	(0.51)	(8.65)
९.	उत्पन्न प्रतिशेअर (अतिरिक्त बाबी के पश्चात) (दर्शनी मूल्य रु. १०/- प्रत्येकी)								
	मूलभूत	(0.24)	(6.18)	(0.68)	(9.09)	(0.28)	(6.09)	(0.52)	(9.15)
	सौम्यीकृत	(0.24)	(6.18)	(0.68)	(9.09)	(0.28)	(6.09)	(0.52)	(9.15)

टीप :
१. वरील विवरण हे सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल करण्यात आलेल्या स्टॉक एक्सचेंजसह स्थायी तिमाही अखेर अहवाल व एकत्रित तिमाही अखेर अहवाल यांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश . दि. ३० जून, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्सचेंज वेबसाइट अर्थात www.bseindia.com व कंपनीची वेबसाइट www.zenithsteelpipes.com वर उपलब्ध आहे.
२. दि. ३० जून, २०१९ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता कंपनीच्या स्थायी व एकत्रित वित्तीय अहवालांचे ऑडिट व सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ च्या आवश्यकतेअनुसार स्थायी व एकत्रित वित्तीय अहवाल वैधानिक आहे व त्यांच्या सुधारित अहवालामध्ये जारी केला आहे.

संचालक मंडळ यांच्याकरिता व त्यांच्या वतीने
पुरुषोत्तम सोनावणे
संचालक
डीआयएन : ०८४०५६५३

ठिकाण : मुंबई
दिनांक : १३ ऑगस्ट, २०१९